महाराष्ट्र शासन
# शासकीय तंत्रनिकेतन, पुणे.
(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
पुणे विद्यापिठ रस्ता पुणे - 411 016.

जा. क्र. – शातंनिपु/प.वि./पदविका प्रमाणपत्र समसत्र २०१९/ ८७० दिनांक : 10 FEB 2022

विद्यार्थ्यांसाठी सूचना

विषय: पदविका प्रमाणपत्र समसत्र-२०१९ च्या वितरणाबाबत...

संदर्भ : जा.क्र.- शातंनिपु/प.बि./पदविका प्रदान/२०२१/१५१ (दिनांक २८/०५/२०२१)

उपरोक्त संदर्भांकित विषयांन्वये समसत्र-२०१९ मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकडून पदविका प्रमाणपत्रा करिता विहित अर्ज ऑनलाईन व पोस्टाद्वारे मागविण्यात आले होते. समसत्र-२०१९ मध्ये उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थांनी पोस्टाने/हस्तदेय अर्ज परीक्षा विभागात पाठविले होते, त्यांचे प्रमाणपत्र तयार झाले आहेत. विद्यार्थ्यांनी खालील दिलेल्या तक्त्यातील वेळापत्रकाप्रमाणे व्यक्तिश: उपस्थित राहून प्रमाणपत्र स्वीकारावे. समसत्र-२०१९ मध्ये उत्तीर्ण झालेल्या ज्या विद्यार्थांनी पोस्टाने/हस्तदेय अर्ज परीक्षा विभागात पाठविले नाही अशा विद्यार्थांनी विहित नमुन्यातील अर्ज, तीन रंगीत पासपोर्ट साईझ फोटो, पदविका प्रमाणपत्र शुल्क रु. ४००/ संस्थेत जमा केल्याची पावती घेऊन खाली दिलेल्या तक्त्यातील वेळापत्रकाप्रमाणे व्यक्तिश: उपस्थित रहावे. येतांना विद्यार्थ्यांनी ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्ड/ PAN कार्ड/ पासपोर्ट याचे मूळप्रत व एक Xerox प्रत सोबत आणणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष २०१०-२०११ च्या आधी प्रवेशित विद्यार्थ्यांनी (FOXPRO) येऊ नये. त्याच्यासाठी स्वतंत्र परिपत्रक प्रसिद्ध जाईल.

| अ क्र | विभागाचे नाव | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| ०१ | माहिती तंत्रज्ञान,<br>ड्रेस डीझाईन & गारमेंट्स म्यॅन्युफॅक्चरिंग | १२/०२/२०२२(सकाळी १०:१५ ते सायंकाळी ०५:०० ) |
| ०२ | स्थापत्य अभियांत्रिकी | १४/०२/२०२२(सकाळी १०:१५ ते सायंकाळी ०५:०० ) |
| ०३ | संगणक अभियांत्रिकी | १५/०२/२०२२(सकाळी १०:१५ ते सायंकाळी ०५:०० ) |
| ०४ | विद्युत अभियांत्रिकी | १६/०२/२०२२(सकाळी १०:१५ ते सायंकाळी ०५:०० ) |
| ०५ | अणुविद्युत आणि दूरसंचार अभियांत्रिकी,<br>धातुशास्त्र अभियांत्रिकी | १७/०२/२०२२(सकाळी १०:१५ ते सायंकाळी ०५:०० ) |
| ०६ | यंत्र अभियांत्रिकी | १८/०२/२०२२(सकाळी १०:१५ ते सायंकाळी ०५:०० ) |

ज्या विद्यार्थ्यांना संस्थेत उपस्थित राहून पदविका प्रमाणपत्र घेणे शक्य नसेल अशा विद्यार्थ्यांना त्यांनी विहित अर्जात नमूद केलेल्या निवासी पत्त्यावर टपालाद्वारे (Speed Post) पाठवण्यात येईल याची नोंद घ्यावी

10/2/2022

परीक्षा नियंत्रक
शासकीय तंत्रनिकेतन, पुणे

प्रत :- १) मा. प्राचार्य यांना माहितीस सविनय सादर.
२) सर्व विभाग प्रमुख यांना विद्यार्थ्यांना अवगत करण्यासाठी.
३) संगणक विभाग प्रमुख यांना संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यासाठी.